## रे.दि.मु.क्र.२४/२०१५ मधील नि.१७ खालील आदेश

१. प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रीया संहीताचे कलम १५१ प्रमाणे सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादीकडुन पोटगी व केस चालवण्याचा खर्च मिळण्याबात दाखल केला आहे. वादीने नि.२१ला म्हणणे दाखल करुन अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा केवळ प्रतिवादीला मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास व्हावा म्हणुन दाखल केला आहे. वादीने दिलेल्या त्रासामुळेच प्रतिवादी ही तिच्या माहेरी मुलीसह राहात आहे. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. प्रतिवादीला दाव्यामध्ये तारखेला हजर राहुन जबाब देणे, वकील फी देणे तसेच जाण्यायेण्याचा खर्च करता येत नाही. केवळ वादीने केलेल्या दाव्यामुळे तिला हा खर्च सोसावा लागतो. म्हणुन प्रतिवादीने सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत तिला व तिच्या मुलीला पोटगी व केस चालवण्याचा खर्च मिळण्याची विनंती केली आहे.

३. वादीने अर्जास सक्त विरोध केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने मे.कोर्टापासुन अनेक महत्वपुर्ण बाबी लपवुन ठेवल्या आहेत. प्रतिवादी ही स्वेच्छेने तिच्या माहेरी राहात आहे. तिचे वडील श्रीमंत आहेत. तिने रिट याचिका सन्माननीय उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ येथे दाखल करुन सदर विवाह संबंध पुर्नस्थापनेचा अर्ज मंगरुळपीर कोर्टातुन बार्शीटाकळी कोर्टात वर्ग करुन घेतला आहे. तिची आर्थिक परीस्थिती चांगली आहे. याउलट वादीला त्याच्या वडीलांना व भावाला व इतर कुटुंबियांना पाहावे लागते. त्यास केवळ चौदा हजार रुपये पगार मिळतो. प्रतिवादीने वादी

विरुध्द कौटुंबिक हिंसाचार कायदयाखाली बार्शीटाकळी न्यायालयात अर्ज केला होता. त्यामध्ये अंतरीम पोटगीची मागणी केली होती. तो अंतरीम पोटगीचा अर्ज बार्शीटाकळी न्यायालयाने नामंजुर केला. त्यावर प्रतिवादीने मे. सत्र न्यायालय, अकोला यांच्याकडे अपील दाखल केले. ते मंजुर झाले. त्यानंतर वादीने त्या आदेशाविरुध्द सन्माननीय उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ येथे रिट पिटीशन क्रमांक ७३२/२०१५ चे दाखल केले. त्यामध्ये मे. उच्च न्यायालयाने, मे. सत्र न्यायालयाचा आदेश स्थगित करुन वादीस रु. १०,०००/— भरण्याचे आदेश केले. त्याप्रमाणे वादीने रु. १०,०००/— डिमांड ड्रॉफ्ट्ने मे. उच्च न्यायालयामध्ये भरले. त्यानंतर तारीख १३.०५.२०१५ रोजी त्या आदेशावर चिडुन जाउन प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वास्तविक प्रतिवादी ही मे. कोर्टात येत देखील नाही. तिने कोणताही तपशिल अर्जामध्ये नमुद केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज खारीज करण्याबाबत वादीने विनंती केली आहे.

४. वादीने प्रस्तुतचा दावा विवाह संबंध पुर्नस्थापीत होण्यासाठी दाखल केला आहे. अभिलेख पाहता सदर दावा हा सुरुवातीस वि.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगरुळपीर यांच्या न्यायालयात सन् २०१४ मध्ये दाखल झाला. त्यानंतर तो या न्यायालयाकडे वर्ग झाला. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज हा तारीख ०६.०९.२०१५ रोजी दाखल केला आहे. वादीने त्याचे म्हणणे तारीख १५.१०.२०१५ रोजी दिले आहे. तेव्हापासुन सदर अर्जाच्या सुनावणीवर काम नेमले होते. प्रतिवादी ही तिच्या मुलीसह प्रत्येक तारखेस हजर होती असे रोजनाम्यावरुन दिसुन येत नाही. तसेच या अर्जाच्या सुनावणीच्या वेळीही ती माझ्या समक्ष हजर नव्हती.

५. अभिलेखावर वादीने दाखल केलेली कागदपत्रे पाहता, विद्यमान कौटुंबिक न्यायालय, अकोला यांनी दरमहा रु.४,०००/— व मुलीस रु. २,०००/— अंतरीम पोटगी इ.पी.क्रमांक १४२/२०१४ मध्ये मंजुर केलेली

आहे. त्याबाबतचा आदेश वादीने नि.२३/१ लगत दाखल केला आहे. तसेच वादीने मे. उच्च न्यायालय या ठिकाणी रु.५०,०००/— व रु. १०,०००/— जमा केल्याबाबतचे डिमांड ड्रॉफ्ट् नि.२५/१ व २५/२ लगत दाखल केलेले आहे. तसेच तारीख २३.११.२०१५ रोजी इ.पी.क्रमांक १४२/२०१४ मध्ये रु.३,०००/— भरल्याची पावती, तारीख ०४.१२.२०१५ रोजी रु.५००/— भरल्याची पावती दाखल केली आहे. मात्र सदर बाबी प्रतिवादीने जाणीवपुर्वक लपवुन ठेवलेल्या आहेत.

६. प्रतिवादीने तिला मंगरुळपीरहुन बार्शीटाकळी येथे येण्याजाण्यास किती खर्च येतो याबाबत काहीही नमुद केलेले नाही. ती आतापर्यंत किती तारखांना न्यायालयात हजर राहीली हे देखील नमुद केलेले नाही. तिने आतापर्यंत किती खर्च केला हे ही नमुद नाही. तिला नेमका किती खर्च झाला अगर होत आहे याबाबतही तपशिल अर्जामध्ये नमुद नाही. तसेच ती प्रत्येक तारखेस तिच्या मुलीसह हजर राहते असे दिसुन येत नाही. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासुन वादी व प्रतिवादी न्यायालयामध्ये हजर राहीलेले नाहीत. अर्ज मोघम व संधिग्न स्वरुपाचा आहे. तसेच प्रतिवादीने ब—याच महत्वपुर्ण बाबी न्यायालयापासुन लपविल्या आहेत. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## **आदेश**

अर्ज नि.१७ नामंजूर करणेत येत आहे.

दिनांक २६.०८.२०१६

( परेश रा. वागडोळे )
दिवाणी न्यायाधीश, क स्तर,
बार्शीटाकळी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. File are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno : | Sau. Hemlata N. Dahake, Steno |
| Court Name : | Civil Judge (Jr.Dn.) & J.M.F.C., Barshitakli |
| Date : | 26-08-2016 |
| Signed by Presiding Officer : | 26-08-2016 |
| Uploaded on : | 30-08-2016 |